तडजोडपत्र

Exh.12/c

# मा.दिवाणी न्यायाधीश साहेब 'व' स्तर न्यायालय, अंबाजोगाई

हिंदु विवाह कायदा प्रकरण क्र.३४१/२०२५

O
..........................
Seen and filed

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.04 17:59:07 +0530

2nd Jt CJSD

अर्जदार : १) गोपाळ पि.भागवत गायकवाड,
वय: ३२ वर्षे, धंदा: ड्रायव्हर,
रा.नांदडी, ता.अंबाजोगाई जि.बीड

२) आनंदिनी भ्र.गोपाळ गायकवाड,
वय: २७ वर्षे, धंदा: घरकाम,
रा.नांदडी, ता.अंबाजोगाई जि.बीड
ह.मु.कुमठा बु., ता.अहमदपुर जि.लातूर

गोपाळ गायकवाड

Anandini

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :— हिंदु विवाह कायदा कलम १३(ib), संमतीने विवाहाचे विच्छेदन (संमतीने घटस्फोट) करणे बाबत.

अर्जदार क्र.१ व २ तर्फे पुढीलप्रमाणे तडजोडपत्र सादर करीत आहे.

१) हे की, सदरील अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ हे आपापसात पती पत्नी असून हिंदु विवाह कायद्याप्रमाणे व हिंदु जाती रिती

रिवाजाप्रमाणे व धर्मशास्त्राप्रमाणे उभयंताचा विवाह दि.३०.०४.२०२१ रोजी झालेला आहे. तेव्हापासून अर्जदार क्र.१ व २ ला आजतागायत कोणतेही आपत्य झालेले नाही.

**२) हे की**, अर्जदार व गैरअर्जदार हे लग्न झाल्यानंतर दोन ते तीन वर्षे एकमेकांजवळ पती पत्नी म्हणून चांगले राहिले त्यानंतर दोघांमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणावरून सतत वाद होवू लागले. सदर वाद विकोपाला जावू नये व दोघांचेही नुकसान होवू नये या बाबीचा विचार दोघांनी करून एकमेकांपासून मागील दीड वर्षाने विभक्त राहून झालेल्या विवाहाचे विच्छेदन करण्या बाबत संमतीने कायदेशीर घटस्फोट घेण्याचे ठरल्यावरून मे.न्यायालयात प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यात आले. व सदर प्रकरणात प्रकरण दाखल करतेवेळी अर्जदार क्र.२ यांना तिच्या आयुष्यभराची एकरकमी पोटगी व नुकसान भरपाई म्हणून रू.६,००,०००/— देण्याबाबत अर्जदार क्र.१ व २ यांच्या नातेवाईकांनी अर्जदाराच्या परस्पर ठरवले होते. यामुळे अर्जात रू.६,००,०००/— देण्याबाबत लिखाण करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात परत अर्जदार क्र.१ व २ यांनी साक्षीदारांसमक्ष आज दिनांक २५.०३.२०२६ रोजी अर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.२ ला कायमस्वरूपी एकरकमी पोटगी व नुकसान भरपाई इत्यादी मिळुन रू.३,८०,०००/— (अक्षरी तीन लाख ऐंशी हजार रूपये) देण्याचे ठरले त्याप्रमाणे अर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.२ ला कोटक महिंद्रा बॅंक, सर्वे नं.२०७, हडपसर सासवड रोड,

गोपाळ गायकवाड

अपोजिट एस.पी.इन्फोसिटी, फुरसुंगी – ४१२३०८, आय.एफ.एस.सी. कोड – KKBK0001784 वरील खाते क्र.३६४५०९४३४२ वरील धनादेश क्र.००००१४ चा रक्कम रू.३,८०,०००/– दिनांक २५.०३.२०२६ चा धनादेशाद्वारे अर्जदार क्र.१ ने स्वत:ची सही करून अर्जदार क्र.२ च्या हक्कात न्यायालयासमोर दिलेला आहे. व याप्रमाणे अर्जदार क्र.२ यांचे अर्जदार क्र.१ यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे आर्थिक अथवा स्थावर मिळकतीवरील हक्क राहीलेले नाहीत. यापुढे अर्जदार क्र.२ ही कोणत्याही प्रकारचा दावा अथवा फौजदारी प्रकरण अथवा स्थावर मिळकतीवरील दावा अर्जदार क्र.१ वर दाखल करणार नाही. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांनी सदर व्यवहार पुर्ण झाल्यास सदर तडजोड पत्राआधारे पालन न केल्यास दोघांनाही न्यायालयाची दिशाभुल केल्या प्रकरणी दंडात्मक कार्यवाही होईल याची जाणीव आहे. याप्रमाणे अर्जदार क्र.१ व २ मध्ये कायमस्वरूपी तडजोड झालेली आहे.

**३) हे की,** अर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.२ यांना दिलेला रक्कम रू.३,८०,०००/– चा धनादेश क्र.००००१४ दिनांक २५.०३.२०२६ हा न वटल्यास अथवा अर्जदार क्र.२ ला न मिळाल्यास न्यायालयासमोर नगदी रक्कम देवून घटस्फोट देण्याचे ठरले आहे.

**४) हे की,** सदर धनादेशाची रक्कम अर्जदार क्र.२ यांना मिळाल्यास त्याचे बॅंक डिटेल्स न्यायालयात दाखल करण्यात येण्याचे

ठरलेले आहे. सदरचा धनादेश हरवला अथवा गहाळ झाल्यास यास अर्जदार क्र.१ हे जबाबदार राहणार नाहीत. तसेच अर्जदार क्र.१ व २ हे सदर विवाहाचे विच्छेदन झाल्यानंतर दुसरे लग्न करण्यास दोघांचीही एकमेकांना संमती आहे. या अटीवर अर्जदार क्र.१ व २ यांना मान्य कबुल असून एकमेकांवरती कोणत्याही स्वरूपाची घटस्फोटानंतर उजरदारी करणार नाहीत. तसेच अर्जदार क्र.२ कडे अर्जदार क्र.१ ने लग्नात घातलेले सोन्याचे दागिने हे अर्जदार क्र.१ यांना परत देणार नाहीत तसेच अर्जदार क्र.२ यांनी लग्नात दिलेले भांडेकुंडे हे अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ यांना देणार नाहीत. यापुढे अर्जदार क्र.१ किंवा अर्जदार क्र.२ व त्यांचे नातेवाईक हे एकमेकांस कोणत्याही प्रकारे फोनद्वारे संभाषण करू नये. करीता सदर समजपत्रा (तडजोडपत्रा) आधारे सदरचे प्रकरणात अर्जदार क्र.१ व २ यांचा दिनांक ३०.०४.२०२१ रोजी झालेल्या विवाहाचे विच्छेदन करण्यात यावे व संमतीने घटस्फोट मंजुर करण्यात यावा व अशा स्वरूपाचा हुकुमनामा अर्जदार क्र.१ व २ च्या हक्कात मंजुर करण्यात यावा. सबब हे तडजोडपत्र दिले ते खरे असे फक्त.

दि.०५/०५/२०२६

अर्जदार क्र.१

गोपाळ पि.भागवत गायकवाड,

अर्जदार क्र.२

आनंदीनी भ्र.गोपाळ गायकवाड

साक्षीदार :—

१) सोनेराव पंडितराव कदम, रा.नांदडी, ता.अंबाजोगाई जि.बीड

२) राजेश्वर व्यंकटराव ढेले, रा.कुमठा बु., ता.अहमदपुर जि.लातूर

३) शोभा व्यंकटराव ढेले, रा.कुमठा बु., ता.अहमदपुर जि.लातूर

मार्फत

अॅड.श्रीनिवास व्ही. कुलकर्णी
अंबाजोगाई